## कुमुदचें प्रकटीकरण

गिरनारची व कुमुद पर्वताची पूर्वीपासून फार मैत्री होती व तूं जेथें राहशील तेथें मी राहीन असा कुमुदचा निश्चय होता. इंद्रधाकानें जसा गिरनार समुद्रांत लपला, तसा कुमुदही लपला व गिरनार जसा बाहेर आला, तसा कुमुदही बाहेर आला.

## कुमुदावर रेवती नक्षत्राघात

गर्गाचार्य ऋषींच्या शापामुळें आकाशांतील रेवती नक्षत्र कुमुद पर्वतावर पडलें, व कुमुद जळूं लागला. आपल्या जिवलग मित्रावर अशी भयंकर आपत्ति आलेली पाहून गिरनार गंगायमुना व सरस्वती या महा-नद्यांना बरोबर घेऊन त्याच्या मदतीनें त्यानें कुमुदावरील दावानळ विझविला. तथापि रेवती नक्षत्राच्या आघातानें कुमुदचे दोन तुकडे झाले.

## रैवताचल नांव कसें पडलें ?

ज्या भागावर रेवती नक्षत्र पडलें, त्या भागाला रैवताचल हें नांव मिळालें, व जो भाग तसाच राहिला, त्याला कुमुद हेंच नांव राहिलें.

## कुमुद नांव कसें पडलें ?

कुमुद म्हणजे चंद्रविकासिनी कमल. ह्या पर्वतावर सुवर्णरंगाचीं कमळें उगवत असत, म्हणून त्यास कुमुद असें नांव मिळालें.

## गिरनार हें नांव कसें पडलें ?

गिरनारला गिरिनारायण व उज्जयंत अशीं नांवें आहेत. गिरनार हें गिरिनारायण ह्या शब्दाचें संक्षिप्त रूप आहे. आतां उज्जयंत शब्दाची अशी मजेदार व्युत्पत्ति आहे ती पाहा. उत्+जयंत. उत्=श्रेष्ठ, उच्च. जयंत=चंद्र (ब्रह्मदेवाचा अंश) जयंत=दत्त (विष्णूचा अंश) जयंत=दुर्वास (शंकराचा अंश) म्हणजे सर्वांत श्रेष्ठ व उच्च देव चंद्र, दत्त व दुर्वास, ब्रह्मा, विष्णु व शंकर.

## उज्जयंत हें नांव कसें पडलें ?

ज्या गिरीवर राहतात तो उज्जयंत.

( गिरनारी पंडित धनशंकर प्रभाशंकर कृत गिरनार महात्म्य अध्याय ४७, पान १८४-१-५ )

## वस्त्रापथ हें नांव कसें पडलें ?

ह्या गिरनारक्षेत्राला वस्त्रापथक्षेत्र असेंही म्हणतात. जेव्हां शंकर कैलासांतून मर्त्य लोकावर गिरनारकडे येऊं लागले, तेव्हां त्यांचें दिव्य वस्त्र जितक्या भागावर पडलें, तितक्या भागाला वस्त्रापथ हें नांव पडलें. सर्व प्रभास क्षेत्रांत वस्त्रापथ ( गिरनार ) हें क्षेत्र फार महत्त्वाचें आहे.

## ह्या क्षेत्रांत तीन मुख्य पर्वत

ह्या क्षेत्रांत तीन मुख्य पर्वत आहेत. उत्तरेस कुमुद मध्यें गिरनार व दक्षिणेस रैवत.

## तीन पर्वतांवर तीन मुख्य देवता

ह्या तिन्ही पर्वतांवर प्रत्येकीं जरी ब्रह्मा, विष्णु, महेश ह्या तिन्हीं देवता वास्तव्य करितात, तरी कुमुदावर ब्रह्मा, रैवतावर विष्णु, व गिरनारवर शंकर ह्या मुख्य देवता आहेत.

## तीन पर्वतांवर प्रत्येकीं तीन तीन देवता

ह्या तीन्ही पर्वतांवर प्रत्येकीं तीन देवता आहेत.

रैवतावर ब्रह्मेश्वर नांवानें ब्रह्मदेव, राधादामोदर नांवानें विष्णु व भवनाथ ( शशिभूषण ) नांवानें शंकर, अशा तीन देवता आहेत. गिरनारवर ह्या वरील तीन्ही देवता गुरुदत्तात्रेय या नांवानें आहेत.

कुमुदचाच भाग रैवत असल्यामुळें रैवतावर ज्या देवता आहेत, त्याच कुमुदवर आहेत.

या वस्त्रापथ म्हणजे गिरनार क्षेत्राची चतुःसीमा खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.

## गिरनार क्षेत्राची चतुःसीमा

पूर्वेसः—पारेश्वर महादेव, सूर्यकुंड; नागदेवी, मार्कंडेयाश्रम, कुमुदतलाव, हेडंब पर्वत, कंकोलीदेवी व रुद्र गंगा.

दक्षिणेसः—वंथली, वामनेश्वर ऊर्फ वामनजी महादेव, भवनाथ राधा दामोदर व सुवर्णगंगा.

दक्षिणेसः—बिलेश्वरमहादेव ( बिलखा ) बोरदेवी माताजी, सिद्धेश्वर ऊर्फ सिद्धिविनायक गणपति व बिल्वगंगा.

उत्तरेसः—रामनाथ ऊर्फ रामेश्वर महादेव. झीणाबावाची मठी. हनुमान धारा, कालिंग, दहकल्पि वीरभद्र पर्वतावर इंद्रेश्वर महादेव व रामगंगा.

या गिरनार क्षेत्रांची पंचतीर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें आहे.:—

## गिरनार क्षेत्राची प्रंचतीर्थि

१ प्रथम श्रीवागीश्वरीदेवीचें दर्शन व पूजन; त्याचप्रमाणें वामनेश्वर महादेवाचें दर्शन व पूजन.

२ नंतर पश्चिम दरवाजाचे बाजूस सिद्धेश्वरमहादेवाचें दर्शन व पूजन. वशिष्टतीर्थ त्रिवेणीकुंड यांचें दर्शन, स्नान व पूजन.

३ नंतर इंद्रकुंड स्नान व नवदुर्गामातृका. सोमेश्वर इंद्रेश्वर यांचें दर्शन व पूजन.

४ नंतर सौभाग्यतलाव ऊर्फ राधाडेरी, रेवतीकुंड, ब्रह्मकुंड, मृगीकुंड भैरवकुंड यांचें स्नान, बाणेश्वर, तिलेश्वर, मुचकुंदेश्वर, विष्णु, दामोदर ब्रह्मेश्वर, सोमेश्वर दुधेश्वर, कालमेघ, भैरव, वस्त्रापथेश्वर यांचें दर्शन व पूजन.

५ नंतर भवनाथाचें दर्शन व पूजन.

## या क्षेत्राची चारी बाजूंची लांबी

या वस्त्रापथ—गिरनार क्षेत्राची लांबी चारी बाजूंस दहा दहा कोसांची आहे.

## चार गंगा

या क्षेत्राचे चार बाजूंस चार गंगा आहेत.

पूर्वेस रुद्रगंगा, पश्चिमेस सुवर्णगंगा, सुवर्णरेषानदी. दक्षिणेस बिल्व-गंगा व उत्तरेस रामगंगा.

## सुवर्णरेषा नदीची मूलपीठिका व तिचा प्रभाव

ब्रह्मदेवाच्या तप:संकल्पाचें महामंत्रमंत्रित जल ह्या पर्वतावर पडून जो प्रवाह वाहूं लागला. तोच प्रवाह म्हणजे ही सुवर्णरेषा नदी. हिच्यांतील वाळू सुवर्णासारखी चकाकते व ती सुवर्णरेषाप्रमाणें दिसते. म्हणून हिला सुवर्णरेषा नदी असें म्हणतात. हिच्यांत हाडकें वितळतात. हा ह्या नदीचा प्रभाव आहे.

## या क्षेत्रांतील पांच रत्नें

या क्षेत्रांत पांच रत्नें आहेत.

१ श्रीगिरनार, २ श्रीशंकर, ३ श्रीगोमुखी गंगा,

४ श्री अंबाजी ( पार्वतीमाता ) ५ श्री. गुरुदत्त.

## या क्षेत्रांतील पांच "र"

या क्षेत्रांत "र" अक्षरवालीं पांच तीर्थे आहेत. अशीं पांच "र" अक्षरवालीं तीर्थे फारच दुर्मीळ आहेत. "र" म्हणजे अग्नि, प्रेम, इच्छा किंवा, वेग.

१ रेवतीकुंड, २ रैवताचल, ३ रविवार तीर्थ, ४ रेवतीतीर्थ, ५ राधा दामोदर.

रेवतीनक्षत्रकुंड बलराम स्त्री-रेवती. तिच्या नांवाचें तीर्थ (याबद्दलच्या कथा गिरनारमहात्म्य अध्याय ३३ मध्यें आहेत.)

## या क्षेत्रांतील पांच "ग"

या क्षेत्रांत 'ग" अक्षरवालीं पांच रत्नें आहेत. ग म्हणजे गंधर्व किंवा गणेश.

१ गिरनार, २ गिरीश, ३ गोमुखीगंगा, ४ गौरी, ५ गुरु

## तीन पर्वतांचीं निरनिराळीं शिखरें

१ कुमुद पर्वताचीं शिखरें:—

सिंह, विजय, कमल, त्रिलोचन, अश्वत्थामा, कुबेर व महामोद.

२ रैवताचलाचीं शिखरें:—

आनंद, कालरोध, सनक, वृष, तोल, कुंभ, गौतम, कृष्ण, रुद्र, कुंजर, व कालमेघ.

३ गिरनार नगाधिराजाचीं शिखरें:—

भैरव, जगपाद, रामानंद, गर्ग, खपर, गौतम, महाशृंग, गुरु, काली, अघोर, श्रीचक्र, अनसूया, रेणुका, व कालिका.

×××सुवर्णरेषा भवनाथ राधा दामोदर, मृगीकुंड.

## गिरनारचें श्रेष्ठ व क्षेत्रमापन

या प्रभासक्षेत्रांत गिरनार उज्जयंत पर्वत मोठा गिरिराज आहे व त्याचें प्रमाण ३ योजनपर्यंतचें आहे.

## गिरनारची प्रदक्षिणा काळ व विस्तार

गिरनारच्या प्रदक्षिणा दोन आहेत. एक लहान व एक मोठी. मोठी प्रदक्षिणा मार्गशीर्ष शु. २ पासून मार्गशीर्ष शु. १५ पर्यंत करितात. लहान प्रदक्षिणा कार्तिक शु. ११ पासून कार्तिक शु. १५ पर्यंत करितात. लहान प्रदक्षिणा पांच योजनें=२० कोस=४० मैलांची आहे. मोठी प्रदक्षिणा ९ योजनें=३६ कोस=७२ मैलांची आहे.

## गिरनार चढतांना वाटेंत कोणतीं तीर्थें, कुंडें व मंदिरें लागतात ?

प्रथम कोटापासून खालीं थोडे उजवे हातावर पंचेश्वर, महादेव व मणिकुंड.

नंतर राजपाद रसकूप व वासवेश्वर महादेव व नंतर भीमकुंड, भीमेश्वर महादेव व महादेव व सिद्धनाथ पादुका. या सिद्धनाथ पादुकांना जैन लोक नेमिनाथ मानतात.

नंतर गोमुखी गंगा येथेंच सुरार्कबटुक भैरव आहे. व विष्णूच्या २४ अवतारांच्या पादुका आहेत. या पादुकांना जैन लोक २४ तीर्थकरांच्या पादुका मानतात.

## गिरनार क्षेत्रांत तीन्ही लोकच्या तीन गंगा आल्या आहेत.

इंद्रराजानें हस्तिपदाच्या ठिकाणीं स्वर्गांतून स्वर्गगंगा पाठविली आहे.

ब्रह्मदेवानें दामोदरजीजवळ ब्रह्मकुंडांत मृत्युलोकांतील भागीरथी गंगा पाठविली आहे.

शेषनागानें गोमुखी गंगेच्या ठिकाणीं पातालांतून पातालगंगा पाठविली आहे.

म्हणजे या क्षेत्रांत तिन्ही लाकांतील तीन्ही देवतांकडून तीन गंगा आल्या आहेत.

नंतर श्री. अंबाजी ( गिरनारचें रक्षण करण्यासाठीं स्वतः जगज्जननी पार्वतीमाता अंबाजी हें नांव धारण करून येथें राहिल्या आहेत. )

नंतर श्री गोरखनाथ. तेथेंच नंदिकेश्वर, रेणुकामाता व भैरव आहेत.

नंतर सिद्धपीठ, व कमंडलुकुंड.

नंतर श्री गुरुदत्तात्रेय तेथेंच रत्नवाटिका किंवा रत्नबाग किंवा रत्नारण्य आहे, व या अरण्यांत रत्नेश्वरमहादेव आहे.

## गिरनारी ब्राह्मण

गिरिनारायण भगवाननें स्वतःच्या मुखापासून प्रथम एक ब्राह्मण उत्पन्न केला. नंतर त्याच भगवानाच्या आज्ञेनें सूर्यनारायणानें स्वतःच्या

मंडळातून दुसरे ८ ब्राह्मण निर्माण केले व शंकरांनीं ३ ब्राह्मण निर्माण केले. याप्रमाणें पूर्वी प्रथम एकंदर १२ ब्राह्मण गिरनारवर निर्माण झाले. पण दैवयोगानें फक्त तीनच प्रकारचे ब्राह्मण हल्लीं गिरनारवर राहतात.

ते ब्राह्मणः—आनंदशर्मा, वृष, घोष, हरदत्त, मरीची, अपरनरोत्तम धनुर्वेद, जयंत, गर्गभूषण, राजभूषण, व विप्रवर्य.

## गिरिनारी ब्राह्मणांना परमात्मांकडून मिळालेली सनद

श्री गुरुदत्तात्रेय पादुकांचें दर्शन घेऊन पूजा करून त्यापुढें दक्षिणा अर्पण करून, गिरिनारी ब्राह्मण जेव्हां "यात्रा परिपूर्ण थई, यात्रा परिपूर्ण थई यात्रा परिपूर्ण थई" असा मुखानें त्रिवार उच्चार करितात, तेव्हांच ( तेरे पितर सरग भयो, तेरे पितर सरग भयो, तेरे पितर सरग भयो असें अक्षय्य वटावरील पिंडदान झाल्यावर गयावळ जसें त्रिवार उच्चार करतात तसें ) गिरनारची यात्रा सफळ होते. यजमानाचा किंवा यात्रेकरूचा उजवा हात गिरिनारी ब्राह्मण आपल्या उजव्या हातांत धरून वरप्रमाणें उच्चार करीत करीत तीन वेळ श्री गुरुदत्तात्रेयांच्या पादुकांभोंवतीं फिरवतात. याप्रमाणें गिरनारचा शेवटचा विधि आहे.

## संशोधन केलें पाहिजे

याप्रमाणें थोडक्यांत गिरनार क्षेत्राचें प्रवासाचें व पौराणिक दंतकथेचें वर्णन दिलें आहे. बारिक दृष्टीनें जर यांतील स्थानांचा त्यांच्या उत्पत्तीचा व राजांच्या कथांचा विचार केला, तर संशोधनास मदत होऊन हिंदुस्थानचा खरा इतिहास मिळणें शक्य आहे. लो. टिळकांनीं ओरायन सुद्धां ग्रीक व जर्मन पौराणिक कथांचा व खेळांचा आधार घेऊन वेदकालाचीं सर्व अनुमानें काढिलीं आहेत. पुराणें, भूमिशास्त्र व इतिहास यांची मदत घेऊनच संशोधन केलें पाहिजे.

मी सुमारें ८ वर्षांपूर्वी श्रीद्वारका, सुदामपुरी ( हल्लीं पोरबंदर ) व सोरटी सोमनाथ या तीन्ही यात्रा केल्या आहेत व प्रस्तुत लेखाचा हा

विषयही नाहीं. तथापि कोणास या यात्रा करणें, झाल्यास त्यांच्याकरितां रेल्वे स्टेशनें व भाडें इतक्यापुरतीच माहिती खालीं देत आहें.

द्वारका, सुदामपुरी, गिरनार व सोरटी सोमनाथ यांपैकीं कोणत्याही ठिकाणीं जावयाचें असल्यास राजकोटला आलेंच पाहिजे. राजकोट हें जंक्शन स्टेशन आहे. येथून जं. डी. म्हणजे जामनगर–द्वारका रेल्वेनें द्वारकेस जावयाचें भाडें दरमाणसीं ४–१०–६ पडतें. ही लाइन छोटी आहे. राजकोटहूनच राजकोट–वेरावळ लाइन निघते. या लाइनवर राजकोटहून तिसरें स्टेशन जेटलसर आहे. जेटलसर पासून पोरबंदर (सुदामपुरी)ला एक फांटा जातो. या फांट्यानें सुदामपुरीस जावयाचें. राजकोटहून जेटलसरचें भाडें सात आणे व जेटलसरहून सुदामपुरी ( पोरबंदर ) चें भाडें १-५-० आहे. राजकोटपासून जेटलसरच्या पुष्कळ पुढें त्याच लाइनीवर जुनागड स्टेशन आहे. तेथून गिरनारला जावयाचें. राजकोटपासून जुनागडचें भाडें १-३-० पडतें, व जुनागडहून वेरावळ स्टेशनला जावयाचें. तेथें उतरून टांग्यांत बसून सोरटी सोमनाथ ( प्रभासपट्टण ) ला जावयाचें. जुनागडपासून वेरावळचे भाडें ०-१३-० पडतें. वेरावळ स्टेशनपासून प्रभासपट्टण २ मैल आहे. टांग्यास ०-१२-० पडतात.

याप्रमाणें या बाजूकडे आल्यावर इच्छा असल्यास चार पुण्यक्षेत्रांचें थोड्या रेल्वेभाड्यांत दर्शन होतें.

ठाणें, गुरुवार } संतपदरजःकणदासानुदास
**बाळकृष्ण विश्वनाथ देव**

श्रीदत्तचित्साई सद्गुरुभ्योन्नमः

# शके १८५७ सालच्या श्रीक्षेत्र शैलधि ( शिरडी ) येथील श्रीसमर्थ सद्गुरु साईबाबा महाराज यांच्या पुण्यतिथिउत्सवाचा वृत्तान्त, जमाखर्च व उत्सवास वर्गणी देणाऱ्या भक्तांची नांवनिशीवार व रक्कमवार यादी

श्री साईलीला संपादक यांस—

प्रेमपूर्वक कृ. शि. सा. न. वि. वि. शके १८५७ आश्विन शु. १० पासून ४ दिवसांचा, व कोजागरी व नवान्नपौर्णिमेचा सविस्तर वृत्तांत जमाखर्च व नांवनिशीवार व रक्कमवार वर्गणी देणाऱ्या भक्तांची यादी प्रथम अनंत साष्टांग नतिततिपूर्वक श्री सद्गुरुचरणकमलीं सादर करून नंतर प्रेमादरपूर्वक जनस्वरूपी जनार्दनास विश्रुत होण्याकरितां आपल्याकडे पाठवीत आहें. तरी आपल्या श्री साईलीलेच्या एखाद्या अंकीं त्यास कृपेनें प्रसिद्धि मिळावी अशी नम्र प्रार्थना आहे.

उत्सवाच्या तयारीकरितां संस्थान मंडळाच्या आज्ञेप्रमाणें श्री. देव हे सहकुटुंब ता. ३० सप्टेंबर रोजीं श्री. पुरंदरे यांना बरोबर घेऊन शिरडीस गेले. ता. ३ आक्टोबर रोजीं श्री. सीताराम पवार हे पुण्याहून आले व ता. ६ रोजीं सौ. वहिनीबाईसाहेब गाडगीळ या येऊन दाखल झाल्या.

## बाहेरगांवची भक्तमंडळी

ठाणें:—श्री. बा.वि. देव, सहकुटुंब-नातू मधुकर व चिरंजीव श्रीपाद व सूनबाई चि.सौ. उमाबाई व कुमारी मीनाक्षी.

,, श्री. सौ. पार्वतीबाई शिवराम कुंटे.

,, श्री लक्ष्मण शिवराम ऊर्फ बाबुराव कुंटे.

वांद्रें:—श्री बळवंत हरि कर्णिक.

,, श्री रघुवीर भास्कर पुरंदरे, प्रशस्थ मदत कोशाध्यक्ष.

खार:—श्री रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खड प्रशस्थ कोशाध्यक्ष.

सांताक्रूझ:—श्री. रावबहादुर मोरेश्वर विश्वनाथ प्रधान विश्वस्त.

,, श्री दत्तात्रय गणेश वैद्य, मुलासह.

,, ,, आत्माराम हरि चौबळ, मुलगा व बंधु.

,, ,, केशव हरि चौबळ.

,, ,, सौ. शांताबाई अंधेरीकर.

,, ,, बसंत नारायण गोरक्षकर.

बोर्डी ,, गजानन बालकृष्ण.

भिवंडी,, रामभाऊ घुले.

मुंबई ,, रामचंद्र श्रीपाद कुरतडकर.

,, ,, डॉक्टर केशरीनाथ वासुदेव सावे.

,, ,, सौ. अन्नपूर्णाबाई सावे.

,, ,, सौ. कोयनाबाई सावे.

,, ,, कु. मंदाकिनी सावे.

,, ,, ,, रत्नप्रभा सावे.

,, ,, सौ. नागूबाई एकनाथ सावे.

,, ,, ,, इंद्रायणी गजानन राऊत.

,, ,, ,, मोघाबाई नार्वेकर.

,, ,, नागेश आत्माराम सावंत फौजदार.

,, ,, मनोहर नागेश सावंत.

,, ,, सदाशिव आत्माराम पाटणकर.

,, ,, मदुसूदन धोंडूजी कांबळी

,, ,, दत्तात्रय राजाराम राणे पोलिस रायटर.

,, ,, विष्णुपंत दुखंडे
,, ,, बनूबाई कीर्तनकार.
,, ,, हरिभाऊ निमकर व त्यांचे साथीदार.
,, ,, नरहरि वीरकर.
मुंबई श्री. सौ. सीताबाई दुखंडे.
,, ,, गणपत बाळकृष्ण.
संगमनेर ,, विष्णु गोविंद देव.
,, ,, सौ. द्वारकाबाई वासुदेव शहाणे.
,, ,, कु. कुसुमबाई देव.
,, ,, रंगनाथ विष्णु देव.
,, ,, शरद् विष्णु देव.
,, ,, सौ. रमाबा देव.
,, ,, दत्तंभट ( महाजन मास्तरचे भाचे )
अहमदनगर ,, आण्णा बाळाजी रासने.
,, ,, विठ्ठल बाळाजी कुंभकर्ण.
नाशिक ,, भाऊसाहेब धुमाळ वकील.
,, ,, सदाशिव बाळाजी जातेगांवकर.
विटे ,, गणेश शिवराम पाटणकर सब रजिष्टर.
भुसावळ ,, गोविंद विनायक वाड हेडक्लार्क.
तळेगांव ,, रावबहादुर ल. वि. पोफळे.
हार्दा ,, जयवंत कृष्ण परूळकर.
पुणें ,, गोविंद काशीनाथ ऊर्फ आपासाहेब.
,, ,, गाडगीळ बॅरिस्टर, संस्थान सदस्य.
,, ,, सौ. लक्ष्मीबाई ऊर्फ वहिनीसाहेब गाडगीळ.
,, ,, सीताराम पवार.
,, ,, प्रो. गणपतराव नरके मुलासह.

कोपरगांव ,, फडके मामलेदारसाहेब, सहकुटुंब व इतर मंडळीसह.
,, ,, बी . आर. खाडीलकर
,, ,, समुद्र सर्कल इन्स्पेक्टर.
निमगांव ,, भागवत.
कोऱ्हाळे ,, रघुनाभभट
,, ,, विष्णुभट
शिवाळें ,, निवृत्तिनाथभट
,, ,, जगन्नाथभट
,, ,, तात्या औटी. ( औटी मास्तरांचे वडील )
शिरवळ ,, दत्तात्रय पांडुरंग ऊर्फ बगोबा माने.
परभणी ,, किसनराव कासार गवई.
वेलापूर ,, ताराबाई गाणारीण १० मंडळीसह.
शिरडी ,, तलाठी शिरडी.

## पुराण व कीर्तन

सोमवारीं विजयादशमीच्या दिवशीं दोनप्रहरीं श्री. किसनराव गवई यांचें कीर्तन श्रीच्या मंदिरांत झालें. मंगळवारीं सकाळीं श्री. देव यांचें पुण्यतिथिआख्यान कीर्तन श्रीच्या ंदिरांत झालें व रात्रीं श्रीद्वारकामाईत श्री. बनूबाई मुंबईकर यांचें कीर्तन झालें. बुधवारीं दुपारीं श्री. किसनराव यांचें कीर्तन श्रीद्वारकामाईत झालें. गुरुवारीं सकाळीं काल्याचें कीर्तन श्रीमंदिरांत श्री. विठ्ठलराव मराठे शिर्डी संस्थान गवई यांनीं केलें व रात्रीं श्रीद्वारकामाईत श्री. बनूबाई यांचें कीर्तन झालें. शुक्रवारीं रात्रीं श्री.बनुबाईचें कीर्तन श्रीद्वारकामाईत झालें. चालू सालीं उत्सव दिवस चार व कीर्तनकार सात. यामुळें श्री. विष्णुपंत दुखंडे व श्री.बापाजी कुळकर्णी यांना कीर्तन करण्यास अवसर मिळाला नाहीं ! किसनराव व विठ्ठलराव हे नवे होतकरू कीर्तनकार व बनूबाई ह्या कसलेल्या प्रौढ मर्यादशील, नृत्यगायनपटु, भक्तिरसपूर्ण शुद्ध, रसाळ व मधुर वाणी, कंठ सुस्वर वगैरे गुणांनीं युक्त. त्यांचीं तीन्ही

कीर्तनें त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणें चित्ताकर्षक व थाटाचीं झालीं. श्री. देव यांचें श्रीज्ञानेश्वरीप्रवचन कार्यक्रमाप्रमाणें श्रीच्या समाधीसमोर होऊन नेहमींप्रमाणें कै. भक्तवर्य काकासाहेब दीक्षित यांच्या वाड्यांत नित्य रात्रीं होतच होतें.

## भोजनपात्रें

सोमवारीं दोन्ही वेळां मिळून भोजनपात्रें अजमासें १५०–१७५ झालीं. मंगळवारीं पुण्यतिथीच्या दिवशीं दोन्ही वेळां मिळून अजमासें भोजन व फराळ मिळून ५०० पानें झालीं. तिसऱ्या दिवशीं अजमासें दोन्ही वेळा मिळून ६०० पानें झालीं. गुरुवारीं दोन्हीं वेळा मिळून २०० पानें झालीं. शिवाय रात्रीं भंडारा भोजनाचीं ७००–८०० पानें झालीं. शुक्रवारीं राहिलेलें भंडारा भोजन व कोजागरी पौर्णिमा निमित्त मिळून ३०० पानें झालीं, व शनिवारीं बाबांच्या बागेंत नवान्नपौर्णिमेच्या दिवशीं सुमारें १०० पानें झालीं. या भोजनाची शोभा अपूर्व होती. वृक्षराजीच्या गर्द छायेंत केळीचीं पानें मांडून रंगवल्ल्या काढल्या होत्या. सर्व मंडळी स्थानापन्न झाल्यावर श्रीसाईमाउलीच्या पुण्य नामाच्या गद्य घोषांत बालगोपालांसह मंडळी भोजनास बसली. भोजनाचा बेत साधाच होता, बाबांच्या बागेंतील केळीचीं पानें, त्याच बागेंतील केळफुलांची, गोवारीच्या शेंगांचीं,अळूची व हिरव्या पोपयांचीं भाजी, सद्भक्त श्रीरघुवीर पुरंदरेदादांच्या स्वतःच्या शेतांतील नव्याचे तांदुळाची खीर, भक्तश्रेष्ठ तात्याबा पाटील कोते यांच्या शेतांतील गव्हाच्या चपात्या, श्री दत्तगुरूचें व्यावहारिक नाम धारणारे नरहरि आचारी स्वयंपाक करणारे, भक्तराज माधवराव देशपांडे यांचे कनिष्ठ चिरंजीव उद्धव वाढणारे, श्री. बाबासाहेब तर्खड, मोरेश्वरराव प्रधान, सुंदरराव नवलकर, रघुवीर पुरन्दरे, तात्याबा पाटील कोते, विठ्ठलराव, किसनराव संस्थान गवई, बनूबाई, विष्णुबोवा दुखंडे कीर्तनकार पुढें होणाऱ्या विवाहास उत्तम शकुन म्हणूनच कीं काय, तासेवाजंत्र्यांच्या थाटांत पण विनोदमस्करीमुळें व दुपारच्या आराम निद्रेंतून मुद्दाम उठवून आणल्यामुळें जरा रागीट मुद्रा

धारण करून आलेले नानू पूजारी आदिकरून मंडळी जेवणारी, दुपारच्या वेळीं म्हणण्यांत येणाऱ्या सारंग, मल्हार, धनाश्री वगैरे सुंदर रागांत गवई व कीर्तनकार यांनीं म्हटलेल्या कर्णसुभग चीजा व घेतलेले कंठमधुर आलाप, बाळा गुरवाचें सनईवादन, व मधून मधून श्री साईमाउलीचें उच्च सुरांत दिव्य व आल्हादकारक नामोच्चारण, एकमेकांस प्रेमाचा आग्रह, अशा विविध प्रकारांनीं विमंडित चाललेल्या स्वर्गीय भोजनाचा आस्वाद घेणाऱ्या भक्तवृंदांच्या मुखांतून त्या भोजनाच्या अलौकिक स्वादिष्टपणाबद्दल व एके वेळीं शकृन्निचय (उकिरडा) असलेल्या स्थानास नंदनवन करून सोडणाऱ्या श्रीसद्गुरुमाउलीच्या अतर्क्य लीलेबद्दल वारंवार धन्योद्गार व नेत्रांतून आनंदाश्रु निघण्यावांचून दुसरें काय निघणार ! खरोखरच रावबहादूर मोरेश्वरराव प्रधानांच्या पुण्याईमुळें व आम्हांस आमच्या सद्भाग्यामुळें हा सोहळा पाहावयास मिळाला ! बाग करण्याचें श्रेय सर्वस्वी श्री. सगुणरावावर आहे, हें सांगावयास नकोच.

कोजागरी पौर्णिमाही थाटाची झाली. रात्रौ यथासांग बाबांच्या चरणाची पूजा तुलसीसहस्रनाम, नारीकेलफल, त्यांचें मधुर पाणी, पेढे, खडीसाखर, पोहे, तापविलेलें शर्करायुक्त व इतर मसाला घातलेलें गरमागरम दूध, लाह्या वगैरे पदार्थांचा श्रीस नैवेद्य, श्रीरजनीरमण तारामणि शीतल रश्मिराजाची पूजा याप्रमाणें कार्यक्रम आटोपल्यावर श्री. देव यांनीं जमलेल्या सर्व भक्तसमूहास कोजागरी कौर्णिमेची कथा सांगून तीर्थ-प्रसाद दिला. ब्राह्मणास भूयसी दिली. नंतर जमलेल्या मंडळींनीं श्रीमंदिरासमोरील सभामंडपांत कथेंत सांगितलेल्या आज्ञेनुसार घटकाभर सारीपाट द्यूत खेळून रात्रीं पहाटे चार वाजतां आपापल्या घरीं गेली.

## भोजनाचा बेत

दरसालप्रमाणें याही सालीं विजयादशमीस व पुण्यतिथीच्या दिवशीं श्रीच्या नैवेद्यास व आराधनाविधीच्या ब्राह्मणांस पंचपक्वान्नें केलीं होतीं.

इतर भक्तसंघास उत्सवाच्या चारी दिवशीं साखरेचा शिरा पोटभर होता. उत्सवाचे चार दिवस कोजागिरी पौर्णिमा व नवान्न पौर्णिमा या सहाही दिवस रोज दोन चटण्या, दोन भाज्या, भात, वरण, तूप, पांढरी पोळी, साखर व मुबलक ताक हेही पदार्थ होतेच.

उत्सवाच्या चारी दिवसांत गांवांतील निमंत्रित मंडळी, परगांवची पाहुणे मंडळी व संस्थानचे नोकरचाकर मंडळी भोजनास आली होती.

भंडारा भोजनास दरसालप्रमाणें गुळाचा शिरा केला होता.

## भिक्षा

सालबादप्रमाणें याही वर्षीं भक्तमंडळींनीं टाळ, मृदंग, निशाण घेऊन श्रीच्या नामाचा जयजयकार करीत गांवांत दोन दिवस (दसरा व पुण्यतिथि दिवशीं) भिक्षा मागितली.

## अभिषेक व आराधनाविधि

सालाबादप्रमाणें या वर्षीं शिरवळकर भटजी वे. मू. रा. दत्तात्रय पांडुरंग ऊर्फ बगंभटजी मोने यांनीं श्रीच्या समाधीवर उत्सव-दिवसांत पवमान लघुरुद्राभिषेक व रुद्रलघुरुद्राभिषेक यथाशास्त्र केले. इतर भक्तांकडूनही श्रीचरणीं सहा लघुरुद्र व ४० एकादशिन्या झाल्या. संस्थानांतील चार उत्सवांपैकीं तीन उत्सवांत याचप्रमाणें भक्तजनांकडून अभिषेकद्वारा सेवा होत असते. दिवसेंदिवस अभिषेकाचें महत्त्व—विशेषें करून पाश्चात्य विद्या-विभूषित विद्वज्जन भक्तांस जास्त जास्त पटूं लागलें आहे. ज्ञात भूतलावरील सर्व देशांत राज्यारोहणप्रसंगीं राजावर जलानें मंत्राभिषिंचन करण्याचा प्रघात आहे. यावरून मंत्रित जलाभिषिंचनांत एक प्रकारची विशिष्ट शक्ति आहे असें सिद्ध होतें. नाहीं तर विसाव्या शतकांतील सुधारणेच्या शिखरा-वर चढलेल्या राष्ट्रांनीं या जलाभिषिंचनविधीला केव्हांच फांटा दिला असता. असो. आमच्या भारतपुत्रांनीं त्या विधीचें महत्त्व लक्षांत घेऊन त्या विधीस ते उत्तेजन देत आहेत हें खरोखरच आर्यमातेचें सुदैव.

## बागेचें उत्पन्न व बागेस देणग्या

या उत्सवांत केळीचीं पानें,केळीचे खुंट,भाजीकरितां केळीचीं (कच्च्या केळ्यांचीं) लोंगरें व केळफुलें, कच्च्या पोपया, अळू, कोंवळ्या कोंवळ्या गोंवारीच्या शेंगा, तसेंच तुळशी, फुलें, हार, शेरे व वगैरे सामान श्रींच्या बागेंतून विकत घेण्यांत आलें. त्याचें उत्पन्न रु. १३-११-० झालें व सौ. जानकीबाई गोविंदराव वाड, भुसावळ, सौ. सीताबाई रामकृष्ण करंदीकर, डहाणू व श्री. वासुदेव केशव ऊर्फ आपासाहेब मंत्री वकील, सातारा, या भक्तवरांनीं बागेच्या खर्चाकरितां अनुक्रमें रु. १०, ५, ५ याप्रमाणें देणग्या दिल्या. या उत्सवांत बागेचें एकंदर उत्पन्न रु. १३-११-० झालें. याप्रमाणें इतर तीन उत्सवांत व्यवस्था करावी.

## श्री भाऊराव कुंभार

उत्सवाच्या सर्व दिवसांत भाऊराव भोजनास आले होते. त्यांचें भोजन म्हणजे लहर लागेल तर व्हावयाचें, नाहीं तर नाहीं.

## औदार्य

श्री. सौ. लक्ष्मीबाई ऊर्फ वहिनीसाहेब गाडगीळ ( बॅरिस्टर आपासाहेब गाडगीळ, पुणें, यांचें कुटुंब ) यांनीं श्रींच्या उत्सवांतील भंडारा-भोजनाचा रु.२९-१०-० खर्च संस्थान कमिटीस देऊन आपलें दानौदार्य प्रकट केलें. वहिनीसाहेब अलीकडे २-३ वर्षे याप्रमाणें भंडारा भोजनाचा खर्च सं. कमिटीस देऊन अखिल गरीब मानवजातीवरील आपलें प्रेम व्यक्त करीत आहेत. असेंच प्रेमौदार्य सतत दरसाल व्यक्त करण्यास बाबा त्यांना प्रेरणा करोत, अशी साईमाउलीच्या चरणीं सविनय प्रार्थना आहे. प्रेमौदार्य अनुकरणीय आहे. या सत्कृत्याबद्दल सं. कमिटी वहिनीसाहेबांची फार आभारी आहे.

## देणगी

या उत्सवांत दरसालप्रमाणें सर्व संस्थान नोकर मंडळीस, तसेंच इतर अनाथ पंगु मंडळीस पैसे व वस्त्रें दिलीं. त्यांची नांवनिशी व कपड्यांची नांवनिशी सोबतच्या जमाखर्चाच्या हिशोबांत दिली आहे.

## जमाखर्च

सोबत जमाखर्चाची यादी, तसेंच ज्या भक्तांकडून या उत्सवकार्यासाठीं वर्गणी आली, त्यांची नांवनिशीवार व रक्कमवार यादी जोडली आहे.

## प्रार्थना व याचना

या पुण्योत्सवकार्यीं या बालसेवकाकडून, तसेंच इतर अनेक कार्यकर्त्या भक्तजनांकडून समजून-न समजून, कुचराईनें, जे अनंत प्रमाद घडले असतील, त्यांबद्दल श्री समर्थ सद्गुरुरायांनीं क्षमा करून उत्सवास उपस्थित असलेल्या प्रत्यक्ष काम करणाऱ्या व उत्सवास उपस्थित न राहतां द्रव्यद्वारा किंवा अन्य प्रकारें उत्सवास सहाय्य करणाऱ्या भक्तगणांवर व या दीन बालकावर अखंड करुणार्द्रतेची पाखर ठेवून या अज्ञान अर्भकाकडून चिरकाल अशीच सेवा घेण्याचा त्यावर अनुग्रह करावा अशी या संतसम्राट श्री. साईदत्तगुरुचरणीं सविनय प्रार्थना व याचना करून आपली रजा घेतों.

## शिखरिणी

शिशूसेवा घ्यावी, सततचि अशी दत्तगुरुजी ॥
न द्या बाधूं बाला, भव[1]विकल दुष्चित्त[2] गुरुजी ॥
तुम्हा ठावे ओढाळचि[4], चपल, तश्चित्त गुरु जी ॥
विरक्ती रज्जूनें स्वर्पदिं करि त्यां बद्ध गुरु जी ॥

ठाणें,
गुरुवार, पौष शु. १
शके १८५७; तारीख
२६ डिसेंबर १९३५

श्रीचरणरज दासानुदास,
**बालकृष्ण विश्वनाथ देव**
शिरडी संस्थान पुण्यतिथ्युत्सव
व्यवस्थापक विश्वस्त.

---

१ संसाररूपा घाबरें करून सोडणारें. २ दुष्ट पित्त. ३ तीव्र, अत्यंत भीषण ४ मोकाट सुटलेलें. ५ जनावर, चतुष्पाद. ६ वैराग्याच्या. ७ दोरखंडानें, चऱ्हाटानें, दोरीनें. ८ आपल्या पायाशीं. ९ त्या चित्ताला. १० बद्ध करीं, बांधून टाका, डांबून ठेवा. ११ घट्ट, बळकट.

श्री दत्तचित्साई सद्गुरुभ्योन्नमः

# शके १८५७ सालच्या श्रीक्षेत्र शैलधि (शिरडी) येथील श्री समर्थ सद्गुरु साईबाबा महाराज यांच्या पुण्यतिथ्युत्सवाच्या जमाखर्चांचा तपशीलवार हिशेब.

## जमा

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ०-०-० | मागील वर्षाची शिल्लक. |
| ३००-०-० | श्री. रामचंद्र आत्माराम ऊर्फ बाबासाहेब तर्खंड, शिरडी संस्थान खजिनदार यांजकडून अगाऊ खर्चाकरतां घेतलेली रकम. |
| ६९३-१४-३ | उत्सवकार्यासाठीं ठिकठिकाणाहून आलेली वर्गणी. |
| २४५-१०-९ | श्री. बाबासाहेब तर्खंड-मार्फत. |
| ३७४-१४-० | श्री. सुंदरराव नवलकर मार्फत. |
| १४-१४-० | श्री. रघुवीर पुरंदरे मार्फत. |
| ५—०-० | श्री. तात्याबा पाटील कोते-मार्फत. |
| १—४-० | श्री. बापूराव बोरावके मार्फत. |
| ५२-३-६ | श्री. देव मार्फत. |
| ६९३-१४-३ | |
| १२-९-६ | भिक्षेचें उत्पन्न. |
| ८—४-६ | रोख |
| ३—४-६ | गहूं १३॥ पायली |

## खर्च

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ६—७-९ | चहा. |
| ०-१२-० | काफी. |
| ३१—५-३ | तांदुळ. |
| ७०—६-३ | तूप. |
| ९—३-० | गोडें तेल. |
| ४—२-० | साखर. |
| ३९-१०-६ | साखऱ्या. |
| १६-१४-९ | गूळ. |
| ११-१०-६ | गहूं. |
| १२—४-० | रवा गव्हांचा. (गरा) |
| ०-१०-६ | कणीक. |
| ६—५-० | तुरीची डाळ. |
| ३—०-६ | चण्याची डाळ. |
| ०—५-० | मुगाची डाळ. |
| ०—५-६ | मसुरीची डाळ. |
| ०—४-६ | मोहरी. |
| ०-१०-० | खोबरें. |
| १—४-६ | मीठ. |
| १-१४-० | तांबडें तिखट. |
| ०—१-६ | दालचिनी. |
| ०—८-० | शहाजिरें. |
| २१८-१-० | |

**जमा**

रु. आ. पै

०—०—६ ज्वारी १ शेर
०—०—६ बाजरी १ शेर
०—१२—६ तांदुळ १ पायली
०—३—० नारळ
१२—९—६

३८—६—६ दोन्हीं पेट्यांतील उत्पन्न
३१—३—९ मंदीरपेटी.
७—२—९ द्वारकामाई पेटी.
३८—६—६

१०४४—१४—३
७—४—३ शिलकी सामान विक्री.
२९—१०—० सौ. वहिनीसाहेब गाडगीळ, पुणें, यांनीं भंडारा भोजनाच्या खर्चाची दिलेली रक्कम.
१०—०—० कोजागरीकरितां संस्थानांतून मंजूर झालेली रक्कम श्री. बाबासाहेब तर्खड, खजिनदार यांजकडून आली ती.

१०९१—१२—६

**खर्च**

रु. आ. पै

२१८—१—० मागील पानावरून
०—१३—३ हळद कुटलेली व बिनकुटलेली
०—१—० जवस.
०—१२—० लवंग.
०—१२—० हिंग.
०—७—३ जिरें.
०—११—६ चिंच.
०—११—० आमसुलें.
१—१—० नारळ.
३—३—० केशर.
०—२—० खारका.
०—३—६ बदाम.
०—४—० कात.
०—४—६ बेदाणा.
०—१०—६ खडीसाखर.
०—६—० बदाम बी.
१—२—० सुपारी.
०—४—० सुंठ.
०—८—० पोहे.
०—५—० वेलदोडे.
०—१—० मेथ्या.
०—४—९ आगपेट्या.
०—४—० मिरें.
०—२—६ डाळें पोह्यांत घालण्याकरितां.
५—६—० बटाटे.
०—९—६ भाजी
१६—२—६ लांकडें.
४—२—० गाडीभाडें.
०—१०—० पानें विड्याचीं.

२५८—४—९

खर्च

| रु. आ. पै. | |
|---|---|
| २५८–४–९ | मागील पानावरून |
| ०–१०–० | राताळीं. |
| ०—३–३ | लिंबें. |
| ०—६–६ | कोथिंबीर. |
| ८—७–० | घासलेट तेल. |
| ०—६–६ | पेरू. |
| २—१–६ | दळणावळ. |
| १—०–० | श्रीचे शामसुंदर घोड्यास ओवाळणी दसऱ्याची. |
| ४—०–० | पेढे श्रीचे नैवेद्यास चार दिवस. |
| ७—०–० | आराधनाविधी खर्च. |
| १—०–० | कोजागरी पूजा, सहस्रनाम व भूयसी दक्षिणा. |
| २—५–० | भोजनदक्षिणा. |
| ४८–१२–० | दूध कोजागरीसुद्धा. |
| १—८–० | भंडारा भोजन मजुरी. |
| ६—०–० | पत्रावळी. |
| १—४–० | द्रोण. |
| ०–१३–० | दहीं. |
| १८–१२–० | रेल्वे खर्च. |
| ६–०–० | पाण्याबद्दल नाना चोपदार यांस ६ दिवसांचे |
| ५–०–० | श्रीचे पेटींत ५ दिवसांची दक्षिणा. |
| १२–१३–० | बाबांच्या बागेंतील केळीचे खुंट, पानें, लोंगरें, गवाऱ्या, पोपया, तुळसी, फुलें, हार, शेरे वगैरे सामानाची किंमत. |
| ३८६–१०–६ | |

**खर्च**

रु. आ. पै.

३८६–१०–६ मागील पानावरून

६––२–० संस्थानांतून घेतलेल्या सामानाची किंमत.

६–१०–० तीन मजुरांची मजुरी.

४––८–० तुळशीची मजुरी.

१––८–० गिरजा परटीणीची मजुरी.

२––४–० शिलाई अबदुलभाईच्या कपड्यांची.

०––२–६ सुतळी.

०––१–० काथ्या.

७––०–० पोस्त उद्धव किसनराव व इतर काम करणारे मंडळीस.

०––८–० खालीं उच्याची किंमत.

०––२–६ मुरमुरे.

१–१०–० टांगाभाडें.

०–१३–३ हमाली.

१४––६–० मोटरभाडें.

०––२–६ जकात (सीताराम पवार यांस द्यावी लागली ती.)

२––८–६ साबूदाणे.

३––२–० शेंगा दाणे.

०––४–३ ओली मिरची.

०––२–३ बेसन पीठ.

०––४–० गुलाल.

१––६–० भगर वऱ्यांची.

०––२–० लाह्या.

३५–३–० कापड-नोकरांस व गरिबांस वांटलें तें.

४७५–८–३

**खर्च**

| रु. आ. पै. | |
|---|---|
| ४७५-८-३ | सागील पानावरून |
| | हात. नांव |
| | ५० अब्दुलभाई लंगोट २, कफन्या २, फडकीं २, एक दुहेरी धोतर. |
| | १० नाना चोपदार धोतर |
| | १० बाळा शिंपी चो. ,, |
| | १० नानू भटजी पु. ,, |
| | १० माधव फसले ,, |
| | १० रंगनाथ गुरव ,, |
| | १० विठ्ठलराव मराठे ,, |
| | १० बाळा गुरव ,, |
| | १० रामू शिंदे ,, |
| | १० बयाजी जगताप ,, |
| | १० रामा न्हावी ,, |
| | १० नारायण शेळके ,, |
| | १० लक्ष्मण बावके ,, |
| | १० महिबू ताशेवाला ,, |
| | १० महिबूचा मुलगा ,, |
| | १० गटू शिंदे ,, |
| | १० अहिल्या ,, |
| | १० अण्णा शिंदे ,, |
| | १० रावजी तेली ,, |
| | १० दस्तगीर ,, |
| | १० निवृत्ति शेळके ,, |
| | १० मार्तंड भगत ,, |
| | ६ सखाराम चांभार ,, |
| | ५ आपा सुतार ,, |
| ४७५-८-३ | |

**खर्च**

रु. आ. पै

४७५–८–३ मागील पानावरून

५ मांग शिंगाठ्या ,,
५ अंधळी परटीण ,,
६ सुरदास ,,
५ मधु न्हावी. ,,
१७ भाऊराव कुंभार ,,
८ देवजी महाराज ,,
१६ नानू पुजारी } फरशी
८॥ रंगू गुरव } व घोडा
१२ महादु फसले } पुसण्यास
म्हाळी—एक लुगडें व
एक खण.

७०–०–० आचारी मुंबई हरिभाऊ निमकर, नरहरि वीरकर वगैरे ३ यांचा येण्याजाण्यासह खर्च.

५१–०–० श्री. बनुबाई बालकृष्ण शिंदे कीर्तनकार मुंबई बिदागी व खर्च.

५–८–० लघुरुद्र-पवमान दक्षिणा.

५–८–० रुद्रलघुरुद्र दक्षिणा.

८–०–० आराधनाविधि ब्राह्मणास जातांयेतांचें भाडें

४८–१–० बाळा गुरवानें केलेला खर्च

२–१०–० प्रसाद पिशव्यांचें कापड.

२–८–० पिशव्या शिलाई.

४२–११–० पोस्टेज.

---

६६३–९–३

खर्च

रु. आ. पै

६६३–९–३

०–४–० दोऱ्याचें रीळ.

११३–९–३ श्री. सुंदरराव नवलकर यांनीं केलेला खर्च.

११–८–० आचाऱ्यास आगाऊ खर्चाकरतां.

१७–८–० पेढे.

१–८–० कऱ्हरें.

२–४–० लेबलें.

१२–०–० निमंत्रण पत्रिका छापणावळ.

४०–३–९ पोस्टेज.

१०–०–० पत्रिका लिहिणावळ

२–०–० लेबलें छापणावळ

०–६–० पताकांचें कापड रंगविलें.

६–०–० धोतरें ६ आराधनाविधि ब्राह्मणांची.

३–६–० उपरणीं ६

०-१३-९ पताका कापड.

०–७–६ प्रसादाचे कागद

०–७–० मोठा डबा.

०–४–६ लहान डबा.

०–०–६ काथ्या

०-१५-० कापड आचाऱ्याकरितां.

७७७–२–६

**खर्च**

रु. आ. पै.

७७७–२–६

३–११–९ पावत्या पाठविण्यास स्टँप.

१–६–० हमाली.

११३–९–३

३–०–६ किरकोळ.

३००–०–० श्री. बाबासाहेब तखंड यांजकडून आगाऊ घेतलेली रकम परत.

३०२–५–९

११–९–६ शिल्लक सं. खजिनदार यांजकडे कायमनिधीस जमा करण्याकरितां दिली ती

१०९१–१२–६

## श्री समर्थ सद्गुरु साईबाबा महाराजांच्या शके १८५७ सालच्या पुण्यतिथीच्या सद्भक्त वर्गणीदारांची नांवनिशीवार व रक्कमवार यादी.

| | | रु. आ. पै. |
|---|---|---|
| श्री. अगाशे वेणूताई | ठाणें | १—०—० |
| ,, अघोर यमुनाबाई | जळगांव | ५—०—० |
| ,, अधिया त्रिभुवन नरोत्तम | डहाणू | ५—०—० |
| ,, अबसरे तात्या महादेव | महाड | २—०—० |
| ,, आरोळकर आ. ला. | पार्ले | ५—०—० |
| ,, आगरकर धोंडू महादेव | पुणें | १०-०-० |
| ,, आचार्य बाळाराम विश्वेश्वर | केळवें | १—०—० |
| ,, आजरेकर केशव गणेश | बेळगांव | ५—०—० |
| ,, आजरेकर दत्तात्रय लक्ष्मण | पुणें | ५—०—० |
| ,, आंजर्लेकर के. आर. | ,, | १—०—० |
| ,, आरस यशवंत गोपाळ | कन्नोड | १—०—० |
| ,, ओगले कमलाबाई | कराची | ०—४—३ |
| श्री. ओझरकर पार्वतीबाई | भाजे | १-११-६ |
| ,, औरंगाबादकर वामन कृष्णराव | खांडवा | ५—०—० |
| सौ. कडेकर पार्वतीबाई | कराची | १—८—३ |
| श्री. कदम काशीबाई | ,, | ०—२—० |
| ,, कदम शंकर | ,, | ०—४—३ |
| श्री. कंटक शामराव भास्कर | मुंबई | १—४—० |
| ,, कर्णिक गजनन त्रिंबक | कल्याण | ५—०—० |
| ,, कर्णिक भालचंद्र त्रिंबक | ,, | २—०—० |
| सौ. करमरकर सीताबाई | कराची | ०—८—३ |
| | | ५८—१०—६ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | मागील पानावरून | ५८-१०-६ |
| कु. | करंजेकर कमलाबाई | पुणे | १-०-० |
| श्री. | करंजेकर बगूबाई | ,, | ०-८-० |
| ,, | करंडे भास्कर विष्णु | मुंबई | ३-०-० |
| ,, | करंदीकर रामकृष्ण जनार्दन | डहाणू | ५-०-० |
| ,, | काका हॅरमसजी दोराबजी | मुंबई | ०-१०-० |
| ,, | कामत सखाराम महादेव | | ५-०-० |
| सौ. | काणे जानकीबाई | कराची | ०-४-३ |
| श्री. | कानिटकर काशीबाई | माटुंगा | ३-०-० |
| कु. | कानिटकर नलिनी अच्युत | ,, | १-०-० |
| श्री. | कानीटकर वामन गोविंद | अहमदनगर | ४-०-० |
| ,, | कारखानीस गोविंद शिवराम | वांद्रें | ०-४-० |
| ,, | कारखानीस वामन शिवराम | ,, | ०-४-० |
| ,, | कारखानीस गणेश शिवराम | ,, | ०-४-० |
| मिसेस | काळे लीलावती | माहीम | २-०-० |
| श्री. | किरणे महादेव पुरुषोत्तम | सातारा | ५-०-० |
| ,, | कीर्तने मधुकर दामोदर | इंदूर | १०-०-० |
| सौ. | कीर्तिकर लहानुबाई गणपतराव, | खार | १-४-० |
| श्री. | कुंठे लक्ष्मण शिवराम | ठाणें | २-०-० |
| ,, | कुडाळकर सदानंद भास्कर | वांद्रें | १-४-० |
| ,, | कुरकुडकर रामचंद्र श्रीपाद | दादर | ०-७-६ |
| ,, | कुरतुडकर रामचंद्र श्रीपाद | माटुंगा | १-८-० |
| ,, | कुलकर्णी दत्तात्रय महादेव | मालाड | ०-४-३ |
| ,, | कुलकर्णी शंकर बंडू | पुणे | १-०-० |
| | | | १०७-८-६ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | मागील पानावरून | १०७–८–६ |
| श्री | केदारी गजानन नारायण | कल्याण | १–०–० |
| ,, | केळकर भिकाजी नारायण | दादर | १–४–० |
| ,, | केळकर यशोदाबाई नारायण | ,, | १–४–० |
| ,, | केळकर लीला भिकाजी | ,, | १–४–० |
| श्री. | कोठारी जीवनदास रामकृष्ण | इंदूर | १०–०–० |
| ,, | कोठारे गणपतराव मोरेश्वर | मुंबई | १–०–० |
| सौ. | कोठारे चंपूबाई गणपतराव | ,, | १–०–० |
| श्री. | कोठारे विश्वनाथ मोरेश्वर | मुंबई | २–०–० |
| ,, | कोठारे श्रीकृष्ण ग. | ,, | १–०–० |
| रा. ब. | कोठारे. गजानन रामचंद्र | खामगांव | ५–०–० |
| श्री. | कोनलाडे रामभाऊ भाऊराव | उमरावती | १–४–० |
| ,, | कोरान्ने महादेव गंगाधर | बिल्लीमोरा | १–४–० |
| ,, | कोहोंजवार शंकर बळवंत | ठाणें | २–०–० |
| ,, | खवणेकर पांडुरंग विठ्ठल | कुर्ला | १–०–० |
| ,, | खंडकर कृष्णराव रामचंद्र | देवास | १–४–० |
| ,, | खाडिलकर नरहर पुरुषोत्तम | सोलापुर | १–०–० |
| ,, | खारकर गोविंद श्रीधर | ठाणे | १–०–० |
| ,, | खारकर श्रीधर नारायण | ,, | १–०–० |
| ,, | गणपति सरस्वती आय. सी. | दादर | १–४–० |
| डॉ. | गव्हाणकर रंगनाथ नारायण | वसई | १०–०–० |
| श्री. | गाडगीळ गोविंद काशीनाथ | पुणें | ५–०–० |
| सौ. | गावेड मुक्ताबाई | कराची | ०–४–३ |
| ,, | गाळवणकर यशवंतराव ज. | वांद्रें | २–०–० |
| | | | १६०–१२–९ |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | मागील पानावरून | १६०–१२-९ |
| श्री. | गिरधर विनायक शंकर | अंधेरी | १–०–० |
| ,, | गुप्ते शांताराम विठ्ठल | कल्याण | २–०–० |
| ,, | गुरुजी दत्तात्रय नारायण | बडोदें | ५–०–० |
| ,, | गोडबोले. एच्. टी. | कल्याण | १–४–० |
| ,, | गोविलकर विठ्ठल केशव | मुंबई | ०–८–० |
| कु. | गोरक्षकर ताराबाई नारायण | सांताक्रुझ | १–४–० |
| श्री. | घोरपडे अनुबाई वहिनीसाहेब | इचलकरंजी | ५–०–० |
| ,, | चव्हाण बी. के | कल्याण | ५–०–० |
| ,, | चांदोरकर महादेव नारायण | ,, | १–०–० |
| सौ. | चितळे गंगाबाई | कराची | ०–५–३ |
| श्री. | चौधरी गोविंद मालु | केळवें | १–०–० |
| ,, | चौबळ आत्माराम हरि | सांताक्रुझ | १–४–० |
| ,, | चौबळ गंगाधर नारायण | वांद्रें | २–८–० |
| ,, | चौबळ एम्. व्ही. | ठाणें | १–०–० |
| ,, | चौबळ यशवंत पुरुषोत्तम | खार | २–४–० |
| ,, | चौबळ श्रीराम नीलकंठ | ,, | २–०–० |
| कुमार. | चोणकर विजयनाथ रा. | बोरिवली | २–०–० |
| ,, | जगताप यमाजी गंगाराम | इंदुर | १–०–० |
| डॉ. | जठार जानकीबाई | खंबालिया | ५–०–० |
| श्री. | जयकर मुकुंदराव शामराव | मुंबई | १–४–० |
| ,, | जयकर शामराव विश्वनाथ | ठाणें | २–०–० |
| ,, | जयकर सोनाबाई | वांद्रें | २–०–० |
| ,, | जुन्नरकर यशवंत राजाराम | धरमपुर | २–०–० |
| | | | २०८–६–० |

| | | | रु. आ. पै. |
|---|---|---|---|
| | | | २०८–६–० |
| श्री | जुवळे दिनकर महादेव | दादर | १–४–० |
| ,, | जोशी मोरेश्वर विश्वनाथ | उंबरगांव | १–०–० |
| ,, | टेमकर लक्ष्मीबाई | कराची | १–०–० |
| ,, | ठक्कर भिमाजी भानजी | मालवण | २–८–० |
| ,, | ठक्कर मदनजी भानजी | ,, | २–८–० |
| ,, | डोळस आ. प. | कांदिवली | ३–०–० |
| ,, | ढवळीकर शंकर मोरेश्वर | पुणें | ७–०–० |
| ,, | तर्खड रा. आ. | खार | ५–२–३ |
| ,, | तन्ना गोवर्धन गिरधर | डहाणू | १९–२–६ |
| रा. सा. | तन्ना नरोत्तमदास गिरधर | ,, | १–०–० |
| श्री. | तवाडीया फरदुनजी पेस्तनजी | मुंबई | ०–१०–० |
| ,, | तळपदे आनंदराव गणपतराव | बांद्रें | १–४–० |
| श्री. | तळपदे सदानंद विनायक | मुंबई | १–०–० |
| ,, | तळवलकर गोपाळ हरि | निमगांव | २–०–० |
| ,, | ताडीवाला होराबजी डी. | सान्ताक्रुझ | १–४–० |
| सौ. | तालचेरकर कृष्णाबाई वि. | इंदुर | ५–०–० |
| ,, | ताम्हणकर पांडुरंग मोरेश्वर | विजापुर | ५–०–० |
| ,, | तेंडले अनंत लालशेट | बांदा | १–४–० |
| सौ. | तेंडूलकर रुक्मिणीबाई | कराची | ०–४–३ |
| ,, | तेंडूलकर, शामसुंदर शंकर | पुणें | १–४–० |
| ,, | तोडणकर सीताराम विष्णु | मुंबई | ५–०–० |
| ,, | त्रिकमदास परशोत्तम | ,, | १०–०–० |
| ,, | दळवी जनार्दन रामचंद्र | वसई | १–४–० |
| | | | २८७–१–० |